परिषदेचे प्रमुख कार्यवाह श्री. प्रदीप कबरे यांनी प्रास्ताविकात नाटय परिषदेच्या कार्याचा अहवाल सादर केला. स्वागताध्यक्ष श्री. जयदत्त क्षीरसागर यांच्यां स्वागतपर भाषणानंतर नाटय परिषदेचे अध्यक्ष श्री. मोहन जोशी यांनी आपले मनोगत व्यक्त केले व पुढील नाटय संमेलन २९ व ३० मे २०१० रोजी न्यू जर्सी, अमेरीका येथे घेण्याची घोषणा केली.

मावळे अध्यक्ष रमेश देव यांनी आपले मनोगत व्यक्त केले व श्री. रामदास कामत यांच्याकडे संमेलनाध्यक्ष पदाची सूत्रे सोपविली. उद्घाटन समारंभातील हा विधी होत असतांना उपस्थित हजारो रसिकांनी टाळयांचा कडकडाट केला. श्री. रमेश देव यांनी श्री. रामदास कामत यांना अध्यक्षीय पुणेरी पगडी घातली व अध्यक्षीय पदक प्रदान केले. आपल्या अध्यक्षीय भाषणात श्री. रामदास कामत यांनी संगीत रंगभूमीचा आढावा घेतला.

यानंतर संमेलनाचे उद्घाटक मा. मुख्यमंत्री ना.श्री. अशोकराव चव्हाण यांचे अभ्यासपूर्ण भाषण झाले. त्यांनी आपल्या भाषणात वृध्द कलावंताचे मानधन दुप्पट करण्याचे तसेच रंगभूमीच्या अभिवृध्दीसाठी अनेक योजना राबविण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर व्यासपीठावरील मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

उद्घाटन सोहळयात श्री. दिलीप प्रभावळकर, श्रीमती भार्गवी चिरमुले आणि श्रीमती संयोगिता पाटील यांचा सत्कार करण्यात आला.

यानंतर दुपारी राम जाधव यांचा 'संक्षिप्त मी नटसम्राट' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. दुपारी ४.०० वाजता 'व्यावसायिक रंगभूमी जगविण्यासाठी प्रेक्षक व कलावंतांची जबाबदारी' हा परिसंवादाचा कार्यक्रम सादर झाला. या कार्यक्रमात सर्वश्री अजय अंबेकर, जयंत पवार, राम रानडे, अशोक पाटोळे, दिलीप शेंडे इत्यादि मान्यवर सहभागी झाले होते. त्यानंतर 'फ्यूजन नृत्य', 'लावण्या', 'दशावतार' इत्यादि कार्यक्रम सादर करण्यात आले. शेवटी मुंबईतील कलावंताचा सहभाग असलेला 'कलारजनी' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. यात मराठी रंगभूमीवरील मान्यवर आणि नामवंत कलावंत सहभागी झाले. रसिकांनी याला उदंड प्रतिसाद दिला.

कै. राम मुकादम रंगमंचावार नाटय परिषदेच्या नाशिक शाखेची 'ट्रेलर', सांगली शाखेची 'गलबत' चिंतामणीनगर शाखेची 'ए प्लेस विथ द पिग्ज', अहमदनगर शाखेची 'माझ्या प्रिय मित्रास' या एकांकिका सादर करण्यात आल्या. त्यानंतर संमेलनाध्यक्ष श्री. रामदास कामत यांचे